महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : १४४२/समोवानि/२०२०/२४ दिनांक:- ११ ऑक्टोबर, २०२२

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय :- सहायक मोटार वाहन निरीक्षक (मुख्य) परीक्षा- २०२०**
**तात्पुरती निवड यादी व भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या(Opting Out) सुविधेबाबत**
**संदर्भ :- १) जाहिरात क्रमांक ०२/२०२० व ०५९/२०२१**
**२) आयोगाच्या संकेतस्थळावरील दिनांक २६ ऑगस्ट, २०२२ रोजीचे प्रसिद्धीपत्रक**

सहायक मोटार वाहन निरीक्षक (मुख्य) परीक्षा- २०२० या परीक्षेची सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर गुणवत्ता यादीच्या आधारे दिनांक २२ मार्च, २०२२ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकान्वये उमेदवारांकडून भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प मागविण्यात आला होता. तद्नंतर आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक २६ ऑगस्ट, २०२२ रोजी भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (Opting Out) सुविधेबाबत प्रसिद्धीपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. सदर प्रसिद्धीपत्रकाच्या अनुषंगाने प्रस्तुत परीक्षेची सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक १० ऑक्टोबर,२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच तात्पुरती निवड यादी (Provisional selection list) प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर यादीआधारे उमेदवारांकडून भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प नव्याने मागविण्यात येत आहे.

**२.** सदर निवड यादी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून उमेदवारांच्या अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी पडताळणीअंती काही उमेदवारांच्या दाव्यांमध्ये/ शिफारशीमध्ये बदल होऊ शकतो.

**३.** खेळाडू प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची क्रीडाविषयक कागदपत्रे प्राधिकृत क्रीडा अधिका-यांनी तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून त्यांचा खेळाडू प्रवर्गाचा दावा तात्पुरता ग्राह्य धरून त्यांचा तात्पुरत्या निवड यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

**४.** प्रस्तुत तात्पुरती निवड यादी मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणामध्ये दाखल विविध न्यायिक प्रकरणांमधील न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात येत आहे.

**५.** प्रस्तुत परीक्षेच्या भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प सादर करण्याकरीता आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' या मेनूमध्ये 'Post Preference / Opting Out' वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंक दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी १२.०० वाजेपासून दिनांक १९ ऑक्टोबर, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत सुरु राहील.

**६. ऑनलाईन पध्दतीखेरीज अन्य कोणत्याही प्रकारे पाठविलेला भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय ग्राहय धरला जाणार नाही. तसेच याबाबत उमेदवारांची कोणतीही बाब / निवेदने / पत्रव्यवहार तद्नंतर विचारात घेतली जाणार नाहीत.**

**७.** भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (Opting Out) विकल्पाआधारे अंतिम निकाल / शिफारशीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. तसेच भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प निवडणा-या उमेदवारांचा अंतिम निकाल प्रक्रियेत समावेश करण्यात येणार नाही.

**८.** भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प सादर करण्यास कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण उद्भवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

**उप सचिव (परीक्षोत्तर-अ.प.)**

**ठिकाण – मुंबई** **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**